# मेट्रो रेल्वेचे मिठी नदीखालील भुयारीकरण पूर्ण

## बीकेसी ते धारावी २९वा टप्पा यशस्वीरीत्या पार

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) - मुंबई मेट्रो रेल महामंडळाने (एमएमआरसी) आज कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गाचा महत्वाचा टप्पा पार केला. या मार्गावरील मिठी नदीखालील दीड किलोमीटर लांबीचे भुयारीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाले. गोदावरी-४ या टनेल बोअरिंग मशिनद्वारे वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) ते धारावीपर्यंत हे भुयारीकरण करण्यात आले.

बीकेसी येथे २१ ऑगस्ट २०१९ रोजी या भुयारीकरणाच्या कामाला सुरूवात झाली होती. मेट्रो-३ मार्गाचा हा भुयारीकरणाचा २९ वा टप्पा होता. या भुयारीकरणासाठी १०४३ आरसीसी रिंग्सचा वापर करण्यात आला. हा टप्पा अत्यंत आव्हानात्मक होता. मुंबईतील गुंतागुंतीची भौगोलिक रचना, भूगर्भातील पाण्याची उच्च पातळी आणि कोरोनामुळे आलेल्या मर्यादा यामुळे हे काम कठीण होते. परंतु आमच्या टीमने हे शिवधनुष्य यशस्वीरित्या पेलले याचा आनंद आहे अशी प्रतिक्रिया एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी व्यक्त केली.



गोदावरी-३ टीबीएम मशिनने बीकेसी ते धारावीपर्यंत दीड किलोमीटर डाऊन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण केले होते. बीकेसी ते धारावी हा अप आणि डाऊन लाईनचा एकूण तीन किलोमीटरचा टप्पा आहे. त्यापैकी ४८४ मीटरचे भुयार हे मिठी नदीच्या पात्राखाली आहे.

मेट्रो-३ च्या पॅकेज ५ मध्ये धारावी, बीकेसी, विद्यानगरी आणि सांताक्रूझ अशी स्थानके आहेत. या पॅकेजमधील आठ किलोमीटर लांबीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. आतापर्यंत १७ टीबीएम मशिन्सच्या मदतीने भुयारीकरणाचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. तसेच ५९ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.